वाचा : जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( म. राज्य ),पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं. /रा .भू.अ.आ.का.४ /प्र.क्र १४/२०१४ /युनिकोड रुपांतरण /प्र.क्रं.१५/२०१२,दिनांक १५/०३/२०१५

---

क्र./ रा.भू.अ.आ.का.४ /प्र.क्र १४/२०१४

प्रमाणीकरण आज्ञावली / १४

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख( महाराष्ट्र राज्य ),पुणे

यांचे कार्यालय ,पुणे.

दिनांक : ०७/०५/२०१५

1 MAY 2015

# परिपत्रक

**विषयः- संगणकीकृत ७/१२ चा डेटा तपासणी व्हेरीफिकेशन ॲण्ड व्हॅलिडेशन**

उपरोक्त विषयांकित बाबत कळविणेत येते की, महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळा अधिकारी समन्वय महासंघाच्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १७/०३/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. तलाठी पटवारी महासंघाने मा. महसूल मंत्री व मा. प्रधान सचिव (महसूल) यांना दिनांक ०३/०३/२०१५ रोजी दिलेल्या आंदोलनाच्या नोटीसीतील मुद्दा क्र. ५ हा राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यात राबविण्यात येणा-या ई-फेरफार प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत आहे.

ई-फेरफार आज्ञावलीमधील संगणकीकृत अधिकार अभिलेखांचा डाटा प्रथमत: अदयावत करावा व त्यानंतर अदयावत संगणकीकृत ७/१२ च्या डाटाचे युनिकोड रुपांतरण करण्याबाबत व तपासणी करण्यात यावे याबाबत इकडील कार्यालयाकडील दिनांक १५/०३/२०१३ रोजीचे परिपत्रकाद्वारे सुचना देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने सदरच्या कामाची ३०% तपासणी मंडळ अधिकारी यांनी १०% तपासणी नायब तहसिलदार (महसूल) यांनी ५% तपासणी तहसिलदार यांनी ३% तपासणी संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी तर १% तपासणी जिल्हाधिकारी यांनी करावी.तपासणी करताना अधिनस्थ अधिका-याने तपासणी केलेलया ७/१२ ची तपासणी न करता इतर ७/१२ तपासणी करावी म्हणजे जास्तीत जास्त ७/१२ तपासले जातील.तपासणी करणा-या अधिका-यांनी तपासणीची कार्यवाही स्वत: करावी ती जबाबदारी इतरांवर सोपवू नये असे अभिप्रेत आहे. त्याअनुषंगाने ट्रायल रन व ऑनलाईन साठी सीडी सादर करताना स्वयंस्पष्ट अहवालासह प्रपत्र १,२ व ३ हे जिल्हाधिकारी यांचेकडून सादर केले जाते. पण सदरचे प्रमाणपत्र पुरेश्या

गांभिर्याने सादर केले जात नाही,असे निदर्शनास आले आहे त्यामुळे संगणीकृत ७/१२ चे डेटामध्ये अनेक त्रुटी उद्भवत आहेत.

वरीलप्रमाणे सुचना दिल्या असल्या तरी त्याप्रमाणे काम होत नसल्याचे व अपूर्ण ७/१२ स्टेट डेटा सेंटरवर अपलोड होत असलेने तलाठी संघटनेच्या पदाधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच असाच अद्यावत ७/१२ स्टेट डेटा सेंटरवर अपलोड झाल्यामुळे ई-फेरफार प्रकल्प यशस्वी होण्यामध्ये अडथळा येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. तसेच यामुळे विभागाची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता वर्तविली आहे.

**ऑनलाईन साठी प्राप्त झालेल्या प्रपत्र - २ सह अहवाल मध्ये काही प्रमाणात खालील प्रमाणे उणिवा दिसून येत असून सदर उणिवाची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

कार्यालयात तहसिल कार्यालयाकडून अतिम डाटा सीडी सोबत साठी प्राप्त होणा-या होणारी अहवालामध्ये खालील प्रमाणे त्रुटी दिसुन येतात. त्यामुळे डाटा सीडी रिजेक्ट होते. तरी आपले अधिनस्त तहसिलदार यांना ट्रायल रनसाठी सादर करावयाच्या सीडी बाबत बॅकअप सीडीची प्रक्रिया जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांचेकडून समजून घेवूनच नविन सॉफ्टवेअरचा वापर करुन सॉफ्टवेअर मधुन तयार होणारे

१) डाटा सीडीतील डेटा वाचता येत नाही / कॉपी होत नाही.

२) अहवालामध्ये प्रपत्र - २ चा समावेश नसतो. १ ) युनिकोड रुपांतरण २ ) गोलू निरंकरण ३) सेवार्थ आयडी रजिस्टेशन ४ ) अहवाल क्रं. ४ अ मधील ( २ - ७/१२ व ८ अ मधील फरक · ४ - गाव नमुना ७ वरील एकुण क्षेत्र व जि.बा. इ. क्षेत्र यांचा मेळ न बसलेले सर्व्हे.क्र. · ५ - ७/१२ व खाता रजिस्टर मधील खात्यावरील नावांचा फरक · ७ - खाता रजिस्टर मध्ये चुकीचे निवडलेले खाता प्रकार ·१० - १६ आणेहुण जास्त आणेवारी असलेले सर्व्हे.क्र. ·११ - इतर अधिकारात नोंदीचा प्रकार निवडेला नाही.·१२ - फेरफार क्र. नसलेल्या इतर अधिकारांच्या नोंदी. ·१३ - भु-धारण पध्दतीसाठी प्रकार निवडेला नाही. ·१४ - ७ भरलेला आहे. पण १२ भरलेला नाही. ४) अहवाल क्रं. ४ ब मधील· १ - गाव नमुना ७ वरील एकूण क्षेत्र व ७/१२ वरील खात्यांचा एकूण क्षेत्राचा फरक · ३ -सुधारीत अहवाल ३ ( गाव नमुना मध्ये पोटविभाग असल्यास ) फरक· ६ - चूकिच्या पध्दतीने भरलेली खादेदाराची नांवे · ८ - फेरफार क्रंमाक नसलेल्या कब्जेदाराची नांवे · ९ - चूकिच्या पध्दतीने भरलेले सर्व्हे क्रंमाक ) ५) अहवाल क्रं. ५ - मधील फेरफार एकूण ६) अहवाल क्रं. ६ - मधील पीक पहाणी ७) अहवाल क्रं. ७ - मधील डीबीए टूल वापर ८) अहवाल क्रं. ८ - मधील सर्व गावांच्या पी डी एफ ९) अहवाल क्रं. ९ - मधील पी डी एफ हस्तलिखित अभिलेखा तपासणी १०) अहवाल क्रं. १० - मधील सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांचे DSC )

३) प्रपत्र - २ हे सॉफ्टवेअर रन करुन न काढता टाईप करुन सादर केले असतात.

४) त्यातील अहवाल क्रं.२,४,५,७,१०,११,१२,१३,व १४ होय असणे आवश्यक आहे.